लाचलुचपत डांग ७५१२

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर — **P.S.(ठाणे):** शेवगांव

**Year (वर्ष):** 2024

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0486

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/05/2024 12:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Date From (दिनांक पासून):** 12/03/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/03/2024

**Time Period (कालावधी):**

**Time From (वेळेपासून):** 11:21 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/05/2024 — **Time (वेळ):** 11:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 012

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/05/2024 11:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.100 किमी — **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शेवगाव पोलीस स्टेशन येथे लाच म

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दादा कारभारी रणनवरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1976

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राटाकळीभान, ताश्रीरामपूर, जि,श्रीरामपुर,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राटाकळीभान, ताश्रीरामपूर, जि,श्रीरामपुर,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पांडुरंग बाबुराव वीर पोलीस हवा | | | 1. नेम- शेवगाव पोलीस स्टेशन , ता,शेवगांव,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs.-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.31/05/2024

मी दादा कारभारी रणनवरे वय- 48 वर्षे, धंदा- शेती, रा.टाकळीभान, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर मो.नं.. 9767389041.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर कुटंूबासह राहण्यास असुन मी दि.11/03/2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री. गोर्डे यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे समक्ष संपर्क करून शेवगाव पोलीस स्टेशनचे वीर पोलीस यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार सांगितली होती. वीर पोलीस यांनी मला दि. 12/03/2024 रोजी सकाळी 11/00 वा. माझ्या विरूद्ध शेवगाव पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या तक्रारी अर्जाच्या चैकशी कामी भेटण्यासाठी बोलाविले असल्याने पोनि गोर्डे यांनी मला दि. 12/03/2024 रोजी सकाळी 10/00 वा शेवगाव येथे सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी दि.12/03/2024 रोजी सकाळी 10/00 वा.चे सुमारास शेवगाव येथे सुरक्षित ठिकाण हजर असताना पोनि गोर्डे हे त्यांच्या सापळा पथकासह तेथे हजर झाले. त्यावेळी पोनि गोर्डे यांनी माझी सापळा पथकाची व दोन पंचांची ओळख करून दिली. त्यावेळी पंचांसमक्ष पोनि गोर्डे यांनी मला माझी लाचे संबंधाने तक्रार विचारली असता मी पंचांसमक्ष सांगितले की, माझ्या विरूद्ध अशिष मोजेश गजभिव यांनी तक्रारी अर्ज दिलेला असुन त्या तक्रारी अर्जाच्या चैकशी कामी मला दि. 26/02/2024 रोजी शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस पांडुरंग वीर यांनी बोलविल्यावरून हजर झालो होतो. त्यादिवशी वीर पोलीस यांनी माझ्या विरूद्ध दाखल असलेल्या तक्रारी अर्जाच्या चैकशीवरून माझ्यावर कारवाई होवु दयायची नसेल तर खर्च करण्याची तयारी ठेवा असे म्हणुन वीर पोलीस हे माझ्याकडे लाच मागणी करत असलेबाबतची तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मला माझी वरील तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.सदर तक्रारीवर मी सही केली व त्यानंतर दोन्ही पंच व पोनि गोर्डे यांनी सहया केल्या.

त्यानंतर मी श्री वीर पोलीस यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि गोर्डे यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकाॅर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर ापोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकाॅर्डर चालू करून, त्या मेमरी कार्डमध्ये काहीही रेकाॅर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यांनतर व्हाईस रेकाॅर्डर चालु करुन त्यामध्ये पोनि गोर्डे, दोन्ही पंच व माझे उपस्थितीबाबत निवेदन रेकाॅर्ड केले.

त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर चालु करून माझ्या ताब्यात देवुन मला पंच नं 1 यांचेसह माझ्याकडील मोटार सायकल क्रं. एम.एच.17 ए.एच.175 वरून रवाना केले, त्याप्रमाणे मी व पंच अशांनी वीर पोलीस यांची शेवगाव पोलीस स्टेशन येथे जावुन त्यांची भेट घेतली सदर भेटीदरम्यान वीर पोलीस व माझ्यात माझ्या विरूद्ध असलेल्या अर्जाबद्ल चर्चा झाली त्यानंतर वीर पोलीस यांनी माझा जबाब लिहुन घेतला व नोटीसवर सही घेतली. त्यानंतर मी वीर पोलीस यांना विचारले की, मी जावु का ? त्यावर वीर पोलीस म्हणाले, पोलीस इथे झक मारू राहिले आणि तुम्ही चालले वर तोंड घेवुन घरी, सगळ पोलीसानीच बोलायला पाहिजे का ? तुम्हाला कळत नाही का ? दोन तासापासुन माझा वेळ वाया घातला, पोलीस असेच आहे का, त्यावेळी मी वीर पोलीस यांना म्हणालो माझा पहिलाच टाइम आहे पोलीस स्टेषनला, त्यावर लोकसेवक वीर म्हणाले, जा बाबा जा, त्यानंतर मी व पंच नं 1 असे मोटार सायकलवरून सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आलो. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी माझ्या ताब्यातली व्हाईस रेकाॅर्डर काढुन घेेवुन तो बंद केला. त्यानंतर मी व पंचांनी वरील प्रमाणे घडलेली हकिकत सांगितली.

त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाॅईस रेकाॅर्डर लॅपटाॅपला युएसबी काॅडच्या सहाय्याने जोडुन त्यातील

निवेदनाच्या संभाषणाचे ध्वनीमुद्रीत फाईलची तसेच माझ्यात व लोकसेवक वीर यांचेत प्रत्यक्ष झालेल्या संभाषणाची फाईल कॉपी करुन घेतली. त्यांनतर पोनि गोर्डे व दोन्ही पंचानी माझ्यात व लोकसेवक वीर यांचेत झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक वीर हे माझ्याशी लाच मागणीच्या उद्देषाने बोलत असल्याचे स्पश्ट झाले. परंतु लोकसेवक वीर यांनी माझ्याकडे लाचमागणी केलेली रक्कम ही स्पश्ट होत नसल्यामुळे सर्वानुमते मला व पंच नं 1 यांना पुन्हा लोकसेवक वीर यांची भेट घेण्यासाठी रवाना करण्याचे ठरले.

त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तो माझ्या ताब्यात देवुन मला व पंच नं.1 यांना लोकसेवक वीर यांची शेवगाव पोलीस स्टेशन येथे भेट घेण्यासाठी माझ्याकडील मोटार सायकलने रवाना केले.त्याप्रमाणे मी व पंच नं 1 अशांनी लोकसेवक वीर यांची शेवगाव पोलीस स्टेशन आवारात भेट घेतली त्यावेळी मी वीर पोलीस यांना म्हणालो, सर नाराज नका राहू काही असल तर सांगा, त्यावर वीर पोलीस म्हणाले, मनाची तयारी पाहिजे, दुसरा पोलीस असता तर तुमच्याकडुन पाच-दहा हजार रूपये घेतले असते, मी तुम्हाला काही म्हणलो का, तुमच्याकडे काही पुरवा नाही तरी तुमच्या म्हणण्याप्रमाणे केले ना, तुम्ही माझ्याकडे आरोपी आहे समजल का, दयायचे तुमच्या हिशोबाने आता मग ते ही तुम्हाला सांगु का? मी म्हणल दया दहा लाख, मग दहा लाख देणार का? हिशोबा हिशोबने दयायच आपल, त्यावेळी मी वीर पोलीस यांना म्हणालो, चार पाचशे रूपये देतो मी तुम्हाला, त्यावर वीर पोलीस म्हणाले, चार-पाचशे कशाला देतो, तुमच्या सारखे शंभर भेटतात रोज, कोण खर कोण खोट बोलत लगेच ओळखतो मी, देणारा एवढे आढे-वेढे घेत नसतो, तुम्ही पाचशे देवु राहिले त्यापेक्षा तुम्ही देवु नका, माझ्याकडे येवु नका व मला फोन करू नका असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं 1 असे माझ्याकडील मोटार सायकलवरून सापळा पथक थांबल्या ठिकाणी परत आलो व घडलेली हकिकत पोनि गोर्डे यांना सांगितली.

त्यांनतर पोनि गोर्डे व दोन्ही पंचानी माझ्यात व लोकसेवक वीर यांचेत झालेले संभाषण ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक वीर यांनी माझ्याकडे लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले. परंतु लोकसेवक वीर हे नेमकी किती लाच रक्कम दयायची हे स्पष्ट सांगत नव्हते.

त्यामुळे पोनि गोर्डे यांनी मला सांगितले की, आपल्याला पंचासमक्ष पुन्हा वीर पोलीस यांची भेट घ्यावी लागेल व नेमकी किती रक्कम दयायची याबाबत चर्चा करावी लागेल त्यावर मी पोनि गोर्डे यांना सांगितले की, वीर पोलीस हे आज मला रागावुन म्हणाले आहे की, माझी पुन्हा भेट घेवु नका, मला फोन करू नका त्यामुळे मला आज रोजी वीर पोलीस यांची भेट घेण्याची इच्छा नाही, वीर पोलीस हे मला पैशासाठी चार पाच दिवसात नक्की फोन करतील अशी मला खात्री आहे. त्यांनी मला फोन केल्यावर मी आपणास त्वरीत कळविल, तो पर्यंत सदरची कारवाई तात्पुरती स्थिगित ठेवावी असे सांगितले. त्यानुसार माझा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. त्यामुळे सर्वानुमते सदर कारवाई तात्पुरती स्थगित करून सदर सापळा कारवाई ही लोकसेवक वीर यांनी माझ्याशी संपर्क केल्यानंतर आयोजित करण्याचे ठरले.

त्यानतर दिनांक 08/04/2024 रोजी मी पोनि गोर्डे यांना फोन करून माहिती दिली की, लोकसेवक वीर पोलीस यांनी मला आजपावेतो संपर्क केला नाही. परंतु माझ्या विरूद्ध शेवगाव पोलीस स्टेषन येथे दाखल असलेल्या तक्रारी अर्जाच्या प्रत मला न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी आवश्यक असल्यामुळे मी दि.10.04.2024 रोजी वीर पोलीस यांची भेट घेवुन सदर अर्जाची प्रत त्यांना मागणार आहे. त्यावेळी वीर पोलीस मला पुन्हा लाचेची मागणी करतील अथवा वीर पोलीस हे लाचमागणी पडताळणी दरम्यान मला म्हणाले होते की, इतर पोलीसांनी तुमच्याकडुन या कामाचे पहिले पाच दहा हजार घेतले असते, तुम्ही तुमच्या मनाने हिशोबा हिशोबाने दया असे म्हणुन लाच मागणी केलेली असुन त्यांचे म्हणण्याप्रमाणे मी माझ्या मनाने पाच हजार रूपये लाच रक्कम घेवुन गेल्यास ते सदरची लाच रक्कम माझ्याकडुन स्विकारतील त्यामुळे दि.10.04.2024 रोजी पुढील कारवाई करावी असे सांगितले. त्यावर पोनि गोर्डे यांनी मला दि.10/04/2024 रोजी सकाळी 10/30 वा चे सुमारास शेवगाव येथे सुरक्षित ठिकाणी पाच हजार रूपये लाच रक्कमेसह हजर राहणे बाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे मी दि.10/04/2024 रोजी सकाळी 10/30 वा.चे सुमारास शेवगाव येथे सुरक्षित ठिकाण हजर असताना पोनि गोर्डे हे त्यांच्या सापळा पथकासह तेथे हजर झाले. त्यांनतर मी लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेल्या 500/- रूपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले त्यानंतर त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात ठेवुन मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला पोनि गोर्डे यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व पंचाची खात्री करून दिली व लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्याबाबत नियोजित इशारा ठरवुन दिला.

त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे ताब्यात देवुन मला पंच नं.1यांचेसह लोकसेवक

वीर पोलीस यांची भेट घेण्याकरीता शेवगाव पोलीस स्टेशन येथे जाण्यासाठी माझे कडील हिरो होन्डा सी.डी. डाॅन मोटार सायकल क्र. एम.एच.17 ए.एच.175 ने रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि गोर्डे, पंच नं. 02, सापळा पथकातील कर्मचारी असे शासकिय वाहनाने येवुन शेवगाव पोलीस स्टेशनच्या आवारात कोणास काही एक संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. पोनि गोर्डे व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच नं. 1 असे वीर पोलीस यांच्या कक्षात गेलो असता त्यावेळी मी माझ्या विरूध्द दाखल असलेल्या तक्रारी अर्जाची प्रत वीर पोलीस यांना मागितली त्यावेळी ते मला म्हणाले, माहितीच्या अधिकारात प्रतची मागणी करा त्यावेळी मी लोकसेवक वीर यांना म्हणालो, मी तुम्हाला नाराज करणार नाही त्या दिवशी माझ्या निट लक्षात आले नाही, तुम्ही त्यादिवशी पाच दहा हजार रूपये म्हणाले पण माझ्याकडे त्यादिवशी पैसे नव्हते त्यामुळे मी तुम्हाला चार पाचशे रूपये देतो असे म्हणालो होतो. त्यावेळी वीर पोलीस यांना माझी काही तरी शंका आली. त्यानंतर त्यांनी आजुबाजुला पाहिले व मला म्हणाले, तुम्हाला मी पैसे मागितले नाही, तुम्ही तुमच्या अर्जाची प्रत माहितीच्या अधिकारात मागणी करून घ्या. त्यानंतर त्यांनी आम्हाला जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच नं 1 असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर बंद करून तो ताब्यात घेतला. त्यावर मी घडलेली हकिकत पोनि गोर्डे यांना सांगितली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकाॅर्डर मधील संभाषण ऐकले ते मी सांगितलेल्या हकिकतीशी मिळते जुळते होते.

त्यानंतर मी पोनि गोर्डे यांना सांगितले की, लोकसेवक वीर हे भविष्यात माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाही, याची मला खात्री झाली आहे. तरी आपण ही सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून आजपावेतो झालेल्या कारवाई वरून वीर पोलीस यांचे विरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात यावी बाबतचा सविस्तर जबाब दिला. सदरबाबत पोनि गोर्डे यांनी गोपनियता बाळगण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी लोकसेवक वीर यांचेबाबत माहिती घेतली असता त्यांचे पुर्ण नाव पांडुरंग बाबुराव वीर, पोलीस हवालदार बक्कल नं. 925, नेमणुक - शेवगाव पोलीस स्टेशन, असे असल्याचे समजले.

तरी लोकसेवक पांडुरंग बाबुराव वीर यांनी दि.12/03/2024 रोजी 11.21 ते 15.25 वा.चे दरम्यान शेवगाव पोलीस स्टेशन येथे लाच मागणी पडताळणी कारवाई च्या वेळी पंच नं.1 यांचेसमक्ष माझ्या विरूध्द शेवगाव पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या तक्रारी अर्जाच्या चैकशीवरून माझ्यावर कारवाई न करण्यासाठी दुसरा पोलीस असता तर तुमच्याकडुन पहिले पाच-दहा हजार घेतले असते, तुम्ही तुमच्या मनाने, हिशोबा हिशोबाने दया, ते ही मी सांगु का? असे मला म्हणुन माझ्याकडे लाच मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन माझी पांडुरंग बाबुराव वीर, पोलीस हवालदार बक्कल नं. 925, नेमणुक - शेवगाव पोलीस स्टेशन, ता. शेवगाव, जि.अहमदनगर यांचे विरूध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

digambar hari bhadane(I (Inspector)) / or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

रोनवरे डि.के.

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
शेवगाव पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): digambar hari bhadi
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):